अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

मराठा आरक्षण

## एसटी महामंडळाला फटका



▶ स्थानिक पोलीस प्रशासनाने दिलेल्या सुचनेनुसार खबरदारीचा उपाय म्हणून मराठवाड्यातील परभणी, धाराशीव, लातूर, जालना, नांदेड, बीड, छ.संभाजीनगर या जिल्ह्यातील सर्व एसटी वाहतूक बंद आहे.

▶ सोलापूर व अहमदनगर जिल्ह्यातील वाहतूक अंशतः बंद आहे. तथापि, इतर जिल्ह्यातील मराठवाड्याकडे जाणारी एसटी वाहतूक बंद करण्यात आली आहे.

▶ उपरोक्त जिल्ह्यातील ६४ आगाराची वाहतूक पुर्णतः बंद आहे. त्यामुळे सुमारे १६ हजार ७०० पेक्षा जास्त बस फेऱ्या दिवसभरात बंद ठेवण्यात आलेल्या आहेत.

▶ गेल्या काही दिवसात १०० पेक्षा जास्त एसटी बसेसची मोडतोड विद्रुपीकरण करण्यात आली आहे. तर ४ बसेसची जाळपोळ केली आहे.

▶ एसटी बसेसची मोडतोड, जाळपोळ झाल्याने अंदाजे ५ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. तथापि, उपरोक्त विभागातील वाहतूक पुर्णतः, अथवा अंशतः बंद असल्याने दररोज एसटीचा ५-५.५ कोटी रुपयांचा तिकीट महसूल बुडत आहे हे मात्र नक्की.

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ३ नोव्हेंबर २०२३ | ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : ३६ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

# ...अखेर मनोमिलन!

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे-पाटील आणि राज्य सरकार यांच्यात गुरूवारी रात्री जालन्यात दिलजमाई झाली. दोन निवृत्त न्यायाधीशांनी दुपारी जरांगे यांची भेट घेतली आणि आरक्षण मिळवण्यासाठी ज्या कायदेशीर त्रुटी आहेत,त्याविषयीची माहिती दिली. आरक्षणात घाईगडबड नको,अशा स्पष्ट शब्दात या निवृत्त न्यायाधीशांनी जरांगेंशी कानगोष्टी करताना सांगितल्या.जरांगे यांनी त्यांचे ऐकले पण त्यांनी देखील ५ मागण्या त्यांच्यापुढे ठेवल्या.२ जानेवारीपर्यंत डेडलाईन दिली. त्यानंतर मात्र मराठा समाज ऐकणार नाही,अशा इशारा जरांगेंनी दिला. जरांगेंच्या ५ मागण्यांवर राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने आश्वासन दिल्यानंतर जरांगे यांनी रात्री उपोषण सोडले.**

## ▪ निवृत्त न्यायाधीशांनी पटवले; जरांगेंनी उपोषण सोडले

## ▪ वेळ घ्या, पण आरक्षण द्या ▪ सरकारला २ जानेवारीपर्यंतची मुदत



▪ दोघा निवृत्त न्यायाधीशांनी गुरुवारी मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेतली.



### ▶ निवृत्त न्यायमूर्तींनी सांगितल्या ९ कायदेशीर बाबी

१. घाईघाईत आरक्षणाचा निर्णय घेतल्यास कोर्टात टिकणार नाही. २. थोडा वेळ द्या, मराठा समाजाला नक्की आरक्षण मिळेल ३. एक दोन दिवसात आरक्षणाचा निर्णय घेता येत नाही. ४. मराठा समाजाला कोर्टात टिकणारं आरक्षण देण्याचा प्रयत्न आहे. ५. मराठा आरक्षणासाठी डेटा तयार करण्याचं काम सुरु आहे. ६. सुप्रीम कोर्टानं सांगितल्याप्रमाणे कार्यवाही करत आहोत. ७. कोर्टात निर्णय आपल्याच बाजूने लागेल. ९. कोर्टाच्या निरीक्षणानुसार मराठा समाज मागास सिद्ध झालेला नाही. १०. मराठा आरक्षणासाठी एक नवीन आयोग तयार करणार आहोत.

### ▶ ८ डिसेंबरला विशेष अधिवेशन

मराठा आरक्षणप्रश्नी राज्य सरकार गंभीर असून आगामी ८ डिसेंबर रोजी विशेष अधिवेशन बोलवू असे आश्वासन राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी मनोज जरांगेंना दिले. तसेच घाईघाईत आरक्षणाचा निर्णय घेतल्यास कोर्टात टिकणार नाही, अशी समजूत निवृत्त न्यायमूर्तींनी आणि सरकारच्या शिष्टमंडळाने काढली. मराठा समाजाला कोर्टात टिकणारे आरक्षण देण्याचा प्रयत्न आहे. मराठा आरक्षणासाठी डेटा तयार करण्याचे काम सुरु आहे. सुप्रीम कोर्टाने सांगितल्याप्रमाणे कार्यवाही करत आहोत. मराठा आरक्षणासाठी एक नवीन आयोग तयार करणार आहोत, अशी माहिती शिष्टमंडळाने दिली.

### जरांगे-पाटील यांच्या ५ मागण्या

१. राज्यातील मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या

२. मराठा आरक्षणाच्या सर्वेक्षणासाठी एक पेक्षा अधिक संस्था नेमण्याची जरांगेंची मागणी.

३. मराठा आरक्षणासाठी होणाऱ्या सर्वेक्षणासाठी चालढकल करु नका.

४. सर्वेक्षणासाठी आवश्यक मनुष्यबळ पुरवावं.

५. इतर जातींना आरक्षण दिलं गेलं, मग आम्हाला का नाही?, जरांगेंचा सवाल

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी गेल्या आठवडाभरापासून उपोषणावर बसलेले मनोज जरांगे पाटील यांनी अखेर आपले उपोषण थांबवले. मराठा समाजाला सरसकट आरक्षणासाठी सरकारला २ जानेवारीपर्यंतची मुदत देत मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण मागे घेतले.


महाराष्ट्रातील सर्व मराठ्यांना सरसकट आरक्षण देण्यासाठी समिती काम करेल, असे या चर्चेत ठरले आणि सरकारने ते मान्य केले आहे. आता वेळ घ्या पण आरक्षण द्या. मात्र जोपर्यंत आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत हे आंदोलन सुरू राहील, साखळी उपोषण सुरूच राहील, असा इशाराही मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

माजी न्यायमूर्तींनी काढलेली समजूत, समजून सांगितलेले कायदेशीर बारकावे आणि नंतर सरकारच्यावतीने मंत्र्यांच्या शिष्टमंडळाने दिलेले आश्वासन यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सरसकट आरक्षण देण्यासाठी सरकारला आणखी काही वेळ देत उपोषण सोडण्याची घोषणा केली. समितीने महाराष्ट्रभर काम करून महाराष्ट्रातील मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी काम करावे, असे ठरले आणि ते त्यांनी मान्य केले. अर्धवट आरक्षण घेऊन आमचा एक भाऊ नाराज होईल, असे काही करणार नाही. मात्र जर सरकारने दगाफटका केला. तर यांच्या पूर्ण नाड्या बंद करू. चलो मुंबईची घोषणा करून मुंबई बंद करून टाकू. आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, व्यावसायिक सरकारच्या सगळ्या नाड्या बंद करू, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला. तसेच मराठा आरक्षणासाठी सरकारला आम्ही वेळ देत आहोत. मात्र ही वेळ शेवटची आहे. मराठवाड्यात काम करणाऱ्या समितीने दोन महिन्यांत आपला अहवाल तयार करून सरकारला दोन महिन्यांत अहवाल द्यावा. यामध्ये रक्ताचे नातेवाईक आणि त्यांची सोयरीक असलेल्या आणि राज्यातील मागेत त्या गरजवंत मराठ्याला कुणबी प्रमाणपत्र द्यावं, असं ठरलं आहे. त्यानुसार आम्ही सरकारला २ जानेवारीपर्यंतची मुदत देत आहोत, असे जरांगे पाटील यांनी सांगितले. आंदोलनाला हिंसक वळण लागल्यानंतर राज्याला त्याची जबर किंमत मोजावी लागली.

## १५ लाखांची लाच घेताना ईडी अधिकाऱ्याला अटक

✔ **जयपूर :** राजस्थानमधील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सक्त वसुली संचालनालय अर्थात ईडीच्या एका अधिकाऱ्याला १५ लाखांची लाच घेताना पकडले. ईडीची सर्वत्र धास्ती असतानाच त्याच खात्याच्या अधिकाऱ्यांचे हात भ्रष्टाचाराने बरबटल्याचे या प्रकरणातून सिद्ध झाले आहे.

या राज्यात ईडीकडून विविध ठिकाणी छापे टाकण्यात आले होते. राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या मुलाला देखील ईडीने समन्स दिले होते. मात्र, गुरूवारी राजस्थान पोलिसांच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईने खळबळ उडाली आहे. राजस्थान एसीबीने ईडीच्या अधिकाऱ्याला आणि त्याच्या सहकाऱ्याला कथित १५ लाख रुपयांची लाच घेताना अटक केली आहे. नवल किशोर मीना असे ईडीच्या अधिकाऱ्याचे नाव आहे. नवल किशोर मीना आणि त्याचा सहकारी बाबुलाल मीना याला लाच घेताना रंगेहात अटक केली. तक्रारकर्त्याकडून लाचेची रक्कम स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली.



तक्रारकर्त्याच्या दाव्यानुसार ईडीच्या अधिकाऱ्याने त्यांच्याकडे १७ लाखांच्या लाचेची मागणी केली होती. चिट फंड प्रकरणात अटकेची कारवाई न करण्यासाठी ही लाच मागण्यात आली होती. तक्रारदाराने एसीबीच्या जयपूर नगर तीन यूनिटकडे ईडी कार्यालय इम्फाळ मणिपूरच्या अधिकाऱ्याच्या नावे तक्रार दिली होती. चिट फंड प्रकरणात संपत्ती जप्त न करण्यासाठी आणि अटकेची कारवाई टाळण्यासाठी नवल किशोर मीना यांनी तडजोडीसाठी लाचेची मागणी केल्या प्रकरणी एसीबीकडे तक्रार प्राप्त झाली होती. अंमलबजावणी संचलनालय, इम्फाळ, मणिपूरच्या उपविभागीय कार्यालयातील अधिकारी नवल किशोरी मीना यांनी १७ लाखांची लाच मागितली होती.

## व्यापाऱ्याची फसवणूक; चौघाविरुद्ध गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

व्यापाऱ्याची फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाजार समितीतील आडत व्यापाऱ्याकडून माल नेऊन पैसे न देता ६१ लाख ५५ हजार ५६ रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे.

विकी, विघ्नेश अँड कंपनी (बंगळूर, इरोड व सेलम), एस.नागमणी (रा.अल्कोलम, तमिळनाडू) कुट्टी लिंगेश्वर (रा.श्वेता गारमेंट, तिरुप्पूर, तमिळनाडू), मुरली चंद्रशेखर (रा. तिरुप्पूर, तमिळनाडू) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. आडत व्यापारी सिद्धाप्पा चित्रप्पा बावकर (रा.धर्मराज नगर, शेळगी, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. बावकर यांचा सिद्धेश्वर मार्केट यार्डमध्ये घाऊक व्यापार आहे. त्यांनी विकीला व नागमणीला कांदा पाठविला.तसेच कुट्टी लिंगेश्वर व मुरली याला गूळ पाठविला. चौघांनीही पैसे देण्यास टाळाटाळ करीत फसवणूक केली.



या गुन्ह्याचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक काळे करीत आहेत.



▪ मराठा आरक्षणासाठी बीबी दारफळ येथे तलावात जलसमाधी आंदोलन करण्यात आले.

निवृत्तीच्या उंबरठ्यावरही पैशाची हाव...

## पीडब्लूडीच्या अधीक्षक अभियंत्याला पावणे सहा लाखांची लाच घेताना अटक

✔ **नांदेड :** सेवा निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्याला निविदा मंजूर करण्यासाठी ६ लाख ४० हजारांची लाच घेतल्या प्रकरणी अटक करण्यात आली आहे.

यासोबतच अन्य एका वरिष्ठ लिपिकाला देखील ताब्यात घेतले आहे. बुधवारी मध्यरात्री लाच लुचपत विभागाने ही कारवाई केली आहे. कारवाई दरम्यान मुख्य अभियंत्याच्या घराची झडती घेतल्यानंतर ७२ लाख ९१ हजार रुपये रोकड सापडली आहे.गंजेंद्र हिरालाल राजपूत (वय ५४) असं अटक करण्यात आलेल्या अधीक्षक अभियंताचे नाव आहे. एका क्लासवन अधिकाऱ्यावर कारवाई झाल्याने सार्वजनिक बांधकाम विभागात एकच खळबळ उडाली आहे.

यातील एका कंत्राटदाराला जिल्ह्यातील केदारगुडा, पिंगळी, डोंगरगाव, हदगाव, गोरलेगाव, गुरफळी या रस्त्याच्या कामाचे टेंडर मिळाले होते. तब्बल १४ कोटी १० लाख रुपयाचं हे काम आहे. या कामाची निविदा मंजूर करण्यासाठी अधीक्षक अभियंता गजेंद्र राजपूत यांनी सुरुवातीला ७ लाख रुपयाची लाच मागितली होती. तसेच, कार्यालयातील वरिष्ठ लिपिक विनोद कंधारे यांनी देखील शिफारसीसाठी तक्रारदारास ५० हजाराची मागणी केली होती. दरम्यान, तोडजोडीनंतर ६ लाख ४० हजार रुपये देण्याचे ठरले. त्यानंतर कंत्राटदाराने लाच लुचपत विभागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रार प्राप्त झाल्यानंतर लाच लुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी कार्यालयात सापळा रचला.

## दर्ग्यातून जाताना तरुणाला धारदार वस्तूने मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर

दर्ग्यातून पायी घराकडे जात असताना तरुणाला धारदार वस्तू आणि फरशीने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना सिद्धेश्वर पेठ परिसरातील मलंगशहा दर्गाजवळ बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली .

सोहेल शहाजान शेख (वय २६ रा. डोणगाव रोड, जुनीमिल चाळ) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तो काल रात्री ऊर्स निमित्त दर्ग्यात आला होता.

रात्री ११ वाजेच्या सुमारास घराकडे जात असताना जवळ असलेल्या दाल चांवलच्या टपरीजवळ त्याला अडवून फरीद शेख, दाऊद शेख, साहिल पटेल आणि अन्य तिघांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे. तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




बॅटिंग मिळतच नाही, अशी त्याची तक्रार असायची !

| कल्याण |
|---|
| 113-51-470 |

| मुंबई |
|---|
| 445-30-136 |

# वानखेडेवर लंकादहन



▶ भारताचा श्रीलंकेवर ३०२ धावांनी विजय

▶ मोहम्मद शामीने घेतल्या पाच विकेट्स

✔ **मुंबई : रोहित शर्माच्या भारतीय संघानं श्रीलंकेचा ३०२ धावांनी धुव्वा उडवून, विश्वचषकाच्या साखळीत सलग सातवा विजय साजरा केला. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवरच्या सामन्यात भारतानं श्रीलंकेला विजयासाठी ३५८ धावांचं डोंगराएवढं मोठं आव्हान दिलं होतं. पण त्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेची अवघ्या धावांत दाणादाण उडाली. भारताच्या जसप्रीत बुमरा, मोहम्मद सिराज आणि मोहम्मद शमी या वेगवान त्रिकूटानं श्रीलंकेचा डाव धावांत गुंडाळण्यात मोलाची भूमिका बजावली.**

### भारताचा सेमीफायनलमध्ये प्रवेश

**वानखेडेच्या मैदानावर श्रीलंकेचा पराभव करत भारताने विश्वचषकाच्या सेमीफायनलमध्ये प्रवेश केला. भारताचा हा सलग सातवा विजय होय. यंदाच्या विश्वचषकात सेमीफायनलमध्ये पोहचणारा भारत पहिला संघ आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वातील टीम इंडियाने आपला फॉर्म कायम राखत विजय नोंदवला. भारतीय संघाने गुणतालिकेत पुन्हा एकदा अव्वल स्थान काबिज केलेय.**

त्याआधी, भारताच्या शुभमन गिलचं शतक आठ धावांनी हुकलं. सचिन तेंडुलकरच्या ४९ शतकांच्या विक्रमाची बरोबरी साधण्याचं विराट कोहलीचं स्वप्नही १२ धावांनी भंगलं. पण त्या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी रचलेल्या १८९ धावांच्या भागिदारीच्या जोरावर भारतानं ५० षटकांत आठ बाद ३५७ धावांची मजल मारली.

मुंबई येथील वानखेडे स्टेडियमवर भारतीय संघाने श्रीलंकेला अजिबात संघर्ष करण्याची संधी दिली नाही. ३५८ धावांचा बचाव करताना पहिल्या चेंडूपासूनच लंकेवर वर्चस्व गाजवले. जसप्रीत बुमराहने पहिल्याच चेंडूवर लंकेला धक्का दिला. त्यानंतर सिराज आणि शामी यांनी सावरायची संधीच दिली नाही. भारताच्या गोलंदाजांनी श्रीलंकेचा डाव अवघ्या ५५ धावांवर गुंडाळत ३०२ धावांनी विजय मिळवला. आंतरराष्ट्रीय वनडे क्रिकेटमधील हा सर्वात मोठा विजय ठरला.

कर्णधार कुसल मेंडिस फक्त एका धावेवर बाद झाला. त्यानंतर अंझलो मॅथ्यूज याने १२ धावा केल्या. २९ धावांत लंकेचे आठ फलंदाज तंबूत परतले होते. महिश तिक्षणा आणि रजिथा यांनी अखेरीस थोड्याफार धावा केल्यामुळे ५० लंकेनं ५० धावसंख्या ओलांडली. तिक्षणा १२ धावांवर नाबाद राहिला. तर रजिथा याने १४ धावा केल्या.